e Paper

आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्षे 4थे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 25/04/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 109 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# राघव चड्ढा 6 खासदारांसह भाजपात!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**दिल्ली : राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी आम आदमी पक्षाचा राजीनामा देत 6 खासदारांसह भाजपामध्ये प्रवेश केला आहे. आम आदमी पक्षाच्या राज्यसभेतील दोन तृतियांश म्हणजेच 10 पैकी 7 खासदारांना घेऊन चड्ढा हे भाजपात सामील झाले.**

**2027 च्या पंजाब विधानसभा निवडणुकीआधी आप पक्षाला मोठे खिंडार पडले आहे.**

**"आम्ही आम आदमी पक्षाचे राज्यसभेतील दोन तृतियांश खासदार भारतीय संविधानातील तरतुदीनुसार भारतीय जनता पक्षात सामील होत आहोत", असे आज (24 एप्रिल) राघव चड्ढा पत्रकार परिषदेत म्हणाले. आपचे राज्यसभा खासदार संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांच्यासमवेत त्यांनी पत्रकार परिषद घेतली.**



आम आदमी पक्षाच्या राज्यसभेतील कोणकोणत्या खासदारांनी भाजपात प्रवेश केला, याची सविस्तर माहिती चड्ढा यांनी दिली. राघव चड्ढा यांच्यासह हरभजन सिंग, रजिंदर गुप्ता, विक्रम साहनी, स्वाती मलिवाल, संदीप पाठक आणि अशोक मित्तल असे एकूण 7 राज्यसभा खासदार भाजपात सामील झाल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली.

राघव चड्ढा हे एकेकाळी अरविंद केजरीवाल यांचे निकटवर्तीय होते. पक्ष सोडताना चड्ढा यांनी आम आदमी पक्ष भ्रष्ट नेत्यांच्या हातात गेल्याचे म्हटले. तसेच पक्षाच्या गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी व्हायचे नव्हते, असे चड्ढा म्हणाले. 2022 च्या पंजाब विधानसभा निवडणुकीत आपचे नियोजन राघव चड्ढा यांनी केले होते. ते आम आदमी पक्षाची रणनीती आखणारे पडद्यामागील कलाकार म्हणून ओळखले जात होते.

राघव चड्ढा यांची राज्यसभेतील उपनेते पदावरून हकालपट्टी करून आपने चड्ढा यांना मोठा धक्का दिला. त्यांच्या जागी अशोक मित्तल यांची राज्यसभेच्या उपनेते पदावर नियुक्ती झाली.

आता अशोक मित्तल यांनीही भाजपात प्रवेश केला आहे. संसदेत आपल्याला बोलू दिले जात नाही, असा आरोपही चड्ढा यांनी केला होता. तसेच उपनेते पदावरून हकालपट्टी झाल्यानंतर त्यांनी "शांत झालो आहे, पराभूत नाही", अशी प्रतिक्रिया दिली होती.

# खेळामुळे नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत- महापौर रवि लांडगे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळाला सुद्धा महत्त्व देणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी क्रीडेला तितकेच महत्त्व आहे. खेळामुळे नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास विकसित होतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने नियमितपणे विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे. खेळात खिलाडूवृत्तीचे असणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**

## • निगडीत आमदार चषक जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेला उत्साहात सुरुवात.



निगडी येथील ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयात ग्रामीण खेळाडू विकास प्रकल्प व आमदार उमा खापरे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा 2026 चे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी विधानपरिषद सदस्या आमदार उमा खापरे यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, महापालिकेच्या कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, नगरसदस्य अमित गावडे, ज्ञानप्रबोधिनी निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. मनोज देवळेकर, जयदीप खापरे यांच्यासह शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, क्रीडाप्रेमी, खेळाडू उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबत शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना आणि शिस्त यासाठी खेळात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. क्रीडा स्पर्धांमधून ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळते. अशा स्पर्धांमधूनच भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडत असतात, असे देखील यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले. या उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळी खेळाडू व प्रेक्षकांमध्ये मोठा उत्साह पाहण्यात मिळाला. या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना आपली क्षमता दाखविण्याची संधी उपलब्ध झाली असून युवकांमध्ये क्रीडाविषयी आकर्षण वाढणार आहे, अशा भावना यावेळी खेळाडूंनी व्यक्त केल्या.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 25/04/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# तेलंगणाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ.महेश भागवत यांचा पीसीसीओई मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी, पुणे (दि. 24 एप्रिल 2026) स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना चालू घडामोडींची माहिती ठेवण्यासाठी दररोज काटेकोरपणे वृत्तपत्र वाचन करण्याची गरज आहे. तसेच शैक्षणिक अभ्यास आणि अवांतर वाचन सातत्याने सुरू ठेवावे. मी मराठी वाङ्मय आणि इतिहास हा विषय घेऊन यूपीएससी ची परीक्षा उत्तीर्ण झालो. ज्ञानाला भाषेचं बंधन नसतं हे माझे स्पष्ट मत आहे. जर स्पर्धा परीक्षेत अपयश आले तर आपल्याकडे प्लॅन बी तयार असला पाहिजे असे मार्गदर्शन तेलंगणाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. महेश भागवत यांनी पीसीसीओई मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधताना केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मध्ये डॉ. महेश भागवत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन भागवत यांचे स्वागत केले. यावेळी उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे व अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीयू नियामक मंडळ सदस्य सचिन इटकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शितल कुमार रवंदळे आदी उपस्थित होते.

डॉ. महेश भागवत यांनी सांगितले की, नागरिकांना पोलिसांकडून खूप अपेक्षा आहेत. परंतु पोलीस यंत्रणेवर देखील खूप कामाचा ताण आहे. सध्या पोलिसांकडे 25 टक्के गुन्हे हे सायबर क्राईमचे नोंद होत आहेत. या विषयी नागरिकांमध्ये जागृती होणे गरजेचे आहे. आपल्या परिसरातील जागरूक नागरिकांनी पोलिस मित्र म्हणून काम करावे असे आवाहन डॉ. भागवत यांनी केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले की, डॉ. महेश भागवत हे 1995 मध्ये दुसऱ्या प्रयत्नात आयपीएस परीक्षा उत्तीर्ण होऊन देशसेवेसाठी रुजू झाले. त्यांनी नक्षलवाद्यांचं पुनर्वसन, मानवी तस्करी रोखणे, त्यांचं पुनर्वसन करणे, बाल मजुरांची सुटका करून त्यांच्यासाठी शाळा सुरु करणे, सायबर क्राईम सारख्या गुन्ह्यांचा कार्यक्षम तपास करणे अशा अनेक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. भारतीय प्रशासनामध्ये सामाजिक भान असलेला संवेदनशील, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे याचा अभिमान वाटतो असेही ज्ञानेश्वर लांडगे यांनी डॉ. भागवत यांचा सत्कार करताना सांगितले.

प्रास्ताविक डॉ. गिरीश देसाई, सूत्र संचालन माधुरी ढमाले यांनी मानले.

समारोप सत्रात पीसीईटीच्या इन्फिनिटी कम्युनिटी रेडिओला भेट देऊन डॉ. भागवत यांनी श्रोत्यांशीहि मनमोकळा संवाद साधला.

# एमडी विक्री करणाऱ्या तिघांना अटक; १३.८६ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई करत एमडी (मेफेड्रॉन) विक्री करणाऱ्या तिघांना अटक केली. आरोपींकडून 116.54 ग्रॅम एमडी, तीन मोबाईल फोन व एक मोपेड असा एकूण 13 लाख 86 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

ही कारवाई 22 एप्रिल रोजी रात्री दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीत खालुंब्रे गावाजवळ करण्यात आली.

पोलीस पेट्रोलिंगदरम्यान संशयास्पद हालचाली करणाऱ्या मोपेडस्वारांना अडवून तपासणी केली असता त्यांच्याकडे एमडी आढळून आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शिशुपाल धनाराम चौधरी (वय 25), रामदिन भवरलाल चौधरी (वय 24) तसेच त्यांना मेफेड्रॉन पुरवणारा परविण मल्लाराम चौधरी (वय 22) यांचा समावेश आहे.

तिघांविरुद्ध दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जासभाये करीत आहेत.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 25/04/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रशिक्षण केंद्रास भेट ; जनगणना मोहिमेला वेग

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या जनगणना प्रशिक्षण मोहिमेअंतर्गत आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज ड क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक 26 मधील कै. मारुती गेनू कस्पटे प्राथमिक शाळा येथे आयोजित प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन प्रशिक्षण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला.**



यावेळी उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार तसेच चार्ज अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे उपस्थित होते.

आयुक्तांनी प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची माहिती जाणून घेतली. प्रशिक्षणाची गुणवत्ता, कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

प्रशिक्षणादरम्यान कर्मचाऱ्यांना जनगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, घरगुती सर्वेक्षणाची पद्धत, अचूक माहिती संकलन तसेच नागरिकांशी प्रभावी संवाद याबाबत मार्गदर्शन केले जात असल्याचे त्यांनी पाहिले. तसेच डिजिटल साधनांचा वापर, अॅप-आधारित डेटा एन्ट्री आणि माहिती पडताळणी प्रक्रियेवर दिला जाणारा भर त्यांनी विशेषत्वाने नोंदवला.

संवाद साधताना आयुक्तांनी जनगणना प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सर्व महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जनगणना स्वयं-नोंदणी करण्याचे आवाहन केले.

या प्रशिक्षणामुळे प्रगणक व पर्यवेक्षक अधिक सक्षम होत असून आगामी जनगणना प्रक्रियेसाठी ते आत्मविश्वासाने सज्ज होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले. महापालिकेच्या या उपक्रमामुळे शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेली अचूक लोकसंख्यात्मक माहिती संकलित होण्यास मोठी मदत होणार आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा 16 मे 2026 ते 14 जून 2026 या कालावधीत पार पडणार असून त्यासाठी तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. अ, ब, क, ड, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आजपासून प्रशिक्षणास सुरुवात झाली असून इ आणि फ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उद्यापासून प्रशिक्षण सुरु होणार आहे. जनगणना ही केवळ आकडेवारी संकलनाची प्रक्रिया नसून भविष्यातील विकासाचे दिशानिर्देशन करणारा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे प्रत्येक प्रगणक व पर्यवेक्षकाने अत्यंत जबाबदारीने, अचूकतेने आणि पारदर्शकतेने माहिती संकलन करणे आवश्यक आहे.या प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना केवळ तांत्रिक बाबींचेच नव्हे, तर नागरिकांशी प्रभावी संवाद साधण्याचे कौशल्यही दिले जात आहे. डिजिटल प्रणालींचा योग्य वापर करून ही प्रक्रिया अधिक जलद, सुलभ आणि विश्वासार्ह करण्यावर आमचा विशेष भर आहे, असे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी यावेळी सांगितले.

# कात्रज घाट बोगद्यानंतर भीषण अपघात रिक्षाचालक ठार, तिघे जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : कात्रज घाट बोगदा पार केल्यानंतर पुण्याकडे येताना दुसऱ्या वळणावर गुरुवारी सायंकाळी एसटी बस आणि ऑटो रिक्षामध्ये भीषण अपघात झाला. हा अपघात आंबेगाव पोलीस ठाणे हद्दीत घडला असून, या दुर्घटनेत रिक्षाचालकाचा मृत्यू झाला तर तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत.**

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य परिवहनची बस (MH 10 DT 2697) आणि ऑटो रिक्षा (MH 12 GS 9695) यांच्यात जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की रिक्षाचे मोठे नुकसान झाले आणि त्यातील प्रवासी गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर तातडीने मदतकार्य सुरु करण्यात आले. जखमींना 108 रुग्णवाहिकेद्वारे जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रिक्षाचालक हनुमंत रमेश हंगरगे (वय 42, रा. सुखसागर नगर, बिबवेवाडी) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या अपघातात जखमी झालेल्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत:

राजेश इंगवले (वय 48, रा. गोकुळ नगर, कात्रज-कोंढवा रोड),

दशरथ निरगुडे (वय 43, रा. अप्पर बिबवेवाडी),

शहाजी लक्ष्मण शिवदे (वय 41, रा. इंदिरानगर, बिबवेवाडी).

दरम्यान, बस चालक जालिंदर विष्णु शिंदे (वय 53, रा. शेडगेवाडी, खानापूर, जि. सांगली) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची वैद्यकीय तपासणी सुरु आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांकडून सखोल तपास सुरु आहे.

या घटनेमुळे कात्रज घाट परिसरात काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी तत्परतेने मदतकार्य करत वाहतूक सुरळीत केली.



# चिखली येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची अभिषेक बारणे यांच्याकडून पाहणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवडचे वाढते शहरीकरण आणि भविष्यातील सांडपाणी व्यवस्थापनाची गरज ओळखून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी चिखली येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला (STP) भेट देऊन तेथील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. चिखली परिसरातील सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी प्रशासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.**



या दौऱ्यादरम्यान सभापती अभिषेक बारणे यांनी प्रकल्पाच्या संपूर्ण कार्यप्रणालीची सविस्तर माहिती घेतली. सांडपाण्याचे शुद्धीकरण कोणत्या स्तरावर केले जाते आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा प्रभावी पुनर्वापर कसा करता येईल, यावर त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. शहरातील जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध तांत्रिक उपाययोजनांचा आढावा घेताना त्यांनी व्यवस्थापकांना सूचनाही केल्या. पर्यावरणाचे रक्षण करण्यासोबतच उपलब्ध पाण्याचा पुनर्वापर करून नैसर्गिक स्त्रोतांवरील ताण कमी करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले. शहराचा होणारा विस्तार पाहता आगामी काळात सांडपाणी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा वि



"भविष्यातील गरजा लक्षात घेऊन चिखली येथील प्रकल्पात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्यावर आणि पूर्ण क्षमतेने हा प्रकल्प राबविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे."

**अभिषेक बारणे**
(सभापती, स्थायी समिती, पिं.चिं.महापालिका)

# चिंचवडमध्ये SIR पुनर्निरीक्षण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड विधानसभा मतदारसंघात मतदार नोंदणी आणि माहिती अद्ययावत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेले 'विषय सखोल पुनर्निरीक्षण शिबिर (SIR Process)' मोठ्या उत्साहात पार पडले. आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगरसेवक सुरेश शिवाजी भोईर यांच्या विशेष प्रयत्नातून हे शिबिर शनिवारी (दि. 18 एप्रिल 2026) आणि रविवारी (दि. 19 एप्रिल 2026) आयोजित करण्यात आले होते.**



या दोन दिवसीय शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मतदार यादीतील नावांची पडताळणी, दुरुस्ती आणि नव्या नोंदणीसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. बी.एल.ओ. म्हणून कार्यरत शिक्षक व शिक्षिकांनी नागरिकांचे तपशील ऑनलाइन पद्धतीने मोबाईलद्वारे नोंदवून प्रक्रिया सुलभ केली.

या उपक्रमात प्रशासन आणि निवडणूक विभागाचे अधिकारी मनोज लोणकर उपस्थित होते. त्याचबरोबर नगरसेविका अपर्णाताई डोके, नगरसेविका मनिषाताई चिंचवडे, माजी पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक मोरेश्वर शेडगे, संघटन मंत्री मधुकर बच्चे, प्रदेश सदस्य अजित कुलथे, उपाध्यक्ष रविंद्र देशपांडे, माजी नगरसेविका कांताबाई मोंढे, योगेश चिंचवडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या शिबिरामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत होण्यास मदत झाली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे. नागरिकांनीही प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करत भविष्यात अशा शिबिरांचे आयोजन नियमितपणे करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968